# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगीरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर:-४४० ००१.
दूरध्वनी : ०७१२-२५५०६७०, Fax : ०७१२-२५५०६७५

**<u>आदेश</u>**

क्रमांक - कक्ष१/रोहया/प्रक्र.१०/ २ /२०१४-१५
नागपूर - ४४० ००१, दिनांक १/४/२०१५

विषय : विविध योजनेअंतर्गत रोपवन व वनीकरणाबाबत सूचना.

संदर्भ: (१) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१४/काआ/७६/१२७/ ९२-९३ / नागपूर दि. ५/८/१९९४.
(२) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/योजना/इए/मवाप्र/९५-९६/ ९३/नागपूर दि. १३/१०/१९९५.
(३) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/इए/मवाप्र/३५९/सा ९६-९७/नागपूर दि. २७/५/१९९६.
(४) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/योजना/मवाप्र ६४६/सा ९६-९७/नागपूर दि. २/७/१९९६.
(५) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/योजना/इए/ मवाप्र ६९२(अ)/नागपूर दि. ५/७/१९९८.
(६) प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/रोहयो/प्रक्र.१०/ १४६९/२०१४-१५ नागपूर दि. ६/१२/२०१४.
(७) मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन),म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-८/प्र.क्र.१६ (१४-१५)/१२६७ दि. ७/३/२०१५

रोपवन कामाबाबत उपरोक्त संदर्भान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. रोपवन कामाबाबत अनेक त्रृटी वारंवार आढळून आल्याचे व यशस्वी रोपवनाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे मूल्यांकन अहवालावरुन दिसून येत आहे. दिनांक १३/१/२०१५ रोजी रोपवनाचे विषयावर नागपूर येथे सर्व मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) व उप वन संरक्षक यांचे उपस्थितीत कार्यशाळा आयोजित करुन चर्चा करण्यात आली असून त्या अनुषंगाने कारवाईचे कृती मुद्दे (action points) ठरविण्यात आलेले आहे. मुख्य वन संरक्षक (मूल्यांकन), महाराष्ट्र राज्य, यांनी रोपवन कामांच्या सुधारणेबाबत निर्गमित कराव्या लागणा-या आदेशाचा मसुदा तयार करुन सादर केलेला आहे, त्याचा विचार करुन रोपवन कामात सुधारणेसाठी खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>१. रोपवनाचे उद्दिष्ट:</u>**

(१) दर वर्षी रोपवनाचे उद्दिष्ट ठरवितांना संबंधित उप वन संरक्षक व मुख्य वन संरक्षक यांनी वन विभाग निहाय रोपवन कामे, वन संरक्षण व इतर वानिकी कामाच्या व्यापाबाबत विचार करुन, रोपवन कामाची पाहणी, पर्यवेक्षण व करण्यात आलेल्या कामाची तपासणी बाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचा विचार करुन रोपवन उद्दिष्ट ठरवावे. रोपवन कामाची शास्त्रोक्त पध्दतीने व गुणवत्ता राखुन रोपवन कामे यशस्वीरीत्या पार पाडणे, रोपवन कामाच्या तपासणीच्या प्रचलीत सूचना इत्यादी बाबी लक्षात घेऊन रोपवन कामाचे उद्दिष्ट ठरवावे.

(२) मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) व संबंधित उप वन संरक्षक यांनी एक वर्षापूर्वी कार्य आयोजनेतील तरतूदींचा विचार करुन उद्दिष्ट ठरविण्याची कार्यवाही करावी. शक्यतो एका रोपवनाचे क्षेत्र २५ हेक्टर पेक्षा जास्त असू नये.

**<u>२. उपचार नकाशा व अंदाजपत्रक:</u>**

(१) कार्य आयोजनेत विहित केलेल्या क्रमांकानुसार कुपामधील ०.४ पेक्षा कमी घनता असलेले क्षेत्र रोपवनासाठी निवडण्यात यावे. वन परिक्षेत्र अधिकारी यांनी प्रस्तावित रोपवन क्षेत्राची पाहणी करुन ठरविण्यात यावे. १०० मी. x ५० मी. ची ग्रीड टाकणे, चाचणी खड्डे खोदणे ही कामे पूर्ण करुन रोपवन क्षेत्रास देण्यात यावयाचे शास्त्रोक्त उपचार निश्चित करावेत त्यानुसार उपचार नकाशा वन परिक्षेत्र अधिकारी यांनी तयार करावा.

(२) रोपवन क्षेत्राच्या उपचाराकरिता व संरक्षणाकरिता आवश्यक त्या बाबी जसे की, खड्डे, गुरे प्रतिबंधक चर, नैसर्गीक पुनरुत्पादनाचा उपचार, मातीचा भरभांगलन, निंदणी, वेडेवाकडे झालेले वृक्ष काढणे, थूट जमीनीलगत कापून काढणे, फुटव्यांचे एकेरीकरण, दाट झालेली रोपे काढणे, जलशोषक चर, कुरण विकास इत्यादी बाबी जागेच्या परिस्थितीनुसार व कार्य आयोजनेतील सूचनांचा विचार करुन ठरविण्यात याव्या.

(३) उपचार नकाशा तयार करण्यात आलेल्या दिनांकासह वन परिक्षेत्र अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन उपचार नकाशावर प्रमाणित करावे.

(४) वरील सर्व बाबींचा सारासार विचार करुन अंदाजपत्रक वन परिक्षेत्र अधिकारी यांनी तयार करावे.

(५) शक्यतो एका रोपवनाचे क्षेत्र २५ हेक्टर पेक्षा अधिक असू नये. एका रोपवनात ४ प्रजातीपेक्षा जास्त प्रजातीची लागवड करु नये. परंतु एक किंवा दोन ग्रिडमध्ये दुर्मीळ व नष्ट होत चाललेल्या प्रजातींची लागवड करणे योग्य राहील.

(६) रोपवनाचे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त करण्यापूर्वी सहाय्यक वन संरक्षक / उप विभागीय वन अधिकारी यांनी प्रत्येक रोपवन क्षेत्राची पाहणी करुन उपचार नकाशा व अंदाजपत्रक वन परिक्षेत्र अधिकारी यांनी योग्यरीत्या तयार केले किंवा कसे याची तपासणी करुन त्यानुसार उपचार नकाशावर दिनांकासह स्वाक्षरी करुन प्रमाणित करावे.

(७) सोबत जोडलेल्या प्रपत्रात सहाय्यक वन संरक्षक/उप विभागीय वन अधिकारी यांनी अंदाजपत्रकासोबत प्रमाणपत्र सादर करावे. उपचार नकाशा कार्य आयोजनेतील विहित तरतूदीनूसार व रोपवन कामाबाबत देण्यात आलेल्या विविध सूचनांचे अधिन राहील याची सहाय्यक वन संरक्षक यांनी खात्री करावी व मगच प्रमाणपत्र देण्यात यावे.

(८) सहाय्यक वन संरक्षक/उप विभागीय वन अधिकारी, स्वतंत्र उप विभागासह यांनी त्यांचे कार्य क्षेत्रातील सर्व पूर्व पावसाळी कामाच्या रोपवनांचे उपचार नकाशे व अंदाजपत्रके तपासणी करुन योग्य असल्याची खात्री करुन प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

(९) उपचार नकाशा व अंदाजपत्रकात त्रृटी असल्यास त्यात दूरुस्ती करुन घेणे सहाय्यक वन संरक्षक / उप विभागीय वन अधिकारी यांची जबाबदारी राहील. स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी यांनी प्रत्येक रोपवनाची पाहणी करुन वरील प्रमाणे प्रमाणित करणे आवश्यक राहील.

(१०) उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी यांनी २०% रोपवन स्थळाची पाहणी करुन उपचार नकाशा योग्यरीत्या तयार करण्यात आला किंवा कसे याबाबत पडताळणी करणे आवश्यक आहे. सहाय्यक वन संरक्षकांनी उपचार नकाशाची तपासणी करुन उपचार नकाशावर स्वाक्षरी केली किंवा कसे, उपचार नकाशात व अंदाजपत्रकात जागेच्या परिस्थितीनुसार आवश्यक त्या बाबीं समाविष्ट केलेल्या आहे किंवा कसे याबाबत रोपवनाच्या पाहणीचे वेळी तपासणी करुन खात्री करावी. उपचार नकाशा विहीत सूचनेनुसार तयार न केल्यास तसेच अंदाजपत्रकात व उपचार नकाशात त्रृटी असल्यास आवश्यक सुधारणा करणे आवश्यक आहे.

**३. स्थळानुरुप अंदाजपत्रक:**

(१) रोपवनाचे स्थळानुरुप व जागेवरील परिस्थितीनुसार रोपवन क्षेत्रास शास्त्रोक्त पध्दतीने उपचार देणे करिता आवश्यक त्या बाबींचा समावेश करुन अंदाजपत्रक तयार करावे.

(२) आवश्यकतेनुसार गुरे प्रतिबंधक चर, खड्डे, नैसर्गिक पुनरुत्पादनचा उपचार, गुरे प्रतिबंधक चराची दुरुस्ती इत्यादी बाबींचा समावेश करावा.

(३) संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा सहभाग नसलेल्या प्रकरणी, गुरेप्रतिबंधक चराई असलेल्या ठिकाणी रोपवना भोवती गुरेप्रतिबंधक चर उंचवटा करणे आवश्यक असून त्यानुसार अंदाजपत्राकात तरतूद करावी. सुकलेल्या काटेरी फांद्यांचा कुंपण करु नये.

(४) स्थळानुरुप तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार एका वन विभागात अनुदान कमी पडत असल्यास मुख्य वन संरक्षक यांनी इतर वन विभागातील शिल्लक रक्कम वळती करुन आवश्यक त्या रोपवनासाठी उपलब्ध करुन द्यावे; स्थळानुरुप अंदाजपत्रकासाठी लागणारी एकूण रक्कम एका वन वृत्तासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या एकूण रक्कमेपेक्षा जास्त अनुदान लागणार असेल तर, तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा जेणे करुन इतर वनवृत्ता मधील शिल्लक रक्कमेचा आढावा घेऊन अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४. दर्जेदार बियाणे व रोपे:**

(१) रोपवनाकरिता रोपे तयार करण्यासाठी लागणारे प्रमाणित केलेले बी, सागवन जडया व रोपे उपलब्धतेनुसार एफ.डी.सी.एम.लि. व वन विभागातील संशोधन विभागाकडून खरेदी करण्यात यावे.

(२) उप वन संरक्षक यांनी त्यांचे कार्य क्षेत्रात असलेले मातृ वृक्ष/अधिक वृक्ष/ उमेदवार अधिक वृक्ष /उत्कृष्ट प्रतीचे वृक्ष निवडण्यात यावे. सदर वृक्षाच्या ठिकाणाची अक्षांश व रेखांशची माहिती संकलित करावी व ती दर्शविणारा नकाशा तयार करावा. काही ठिकाणी काही प्रजातीचे उत्कृष्ट प्रतीचे वृक्ष असलेले वन क्षेत्र निवडून सदर क्षेत्र बीज उत्पादन क्षेत्र म्हणून राखुन ठेवावे. एफ.डी.सी.एम.लि. व संशोधन

विभागाच्या अधिका-यांशी सल्ला मसलत करुन सदर बीज उत्पादन क्षेत्रातील हलक्या व कमी प्रतीचे वृक्ष काढणे, त्याचे संरक्षण, बी गोळा करण्यासाठी कार्यवाही करावी. रोपवाटिकेत रोपे तयार करण्यासाठी लागणारे बी माहिती असलेल्या स्त्रोतांकडूनच संकलित केलेल्या बियांचा वापर करण्यात येईल या करिता नियोजन करावे.

(३) रोपवनांची उत्पादकता वाढविण्यासाठी उत्कृष्ट वृक्षापासून व माहिती असलेल्या स्त्रोतांकडुन व बी उत्पादन क्षेत्रापासून बी गोळा करुन रोपवाटिकेत रोपे वाढविणे आवश्यक आहे.

(४) चांगल्या प्रतीची क्लोनल रोपे आणून एका क्षेत्रात लागवडीचे नियोजन करावे व त्यापासून भविष्यात बी गोळा करणे किंवा बडग्राफ्टिंग करुन रोपे निर्मित करणे शक्य होईल.

(५) याबाबत ५ वर्षाचा कालबध्द कार्यक्रम आखणी करावा व दर महिन्यात मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रगतीचा आढावा घ्यावा. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रत्येक वन विभागाबाबत आढावा घेऊन क्षेत्रीय अधिका-यांशी सल्ला मसलत करुन उद्दिष्ट ठरवून देण्यात यावे. सदर उद्दिष्ट Annual Performance Appraisal Report/गोपनीय अहवाल करिता उद्दिष्ट म्हणून ठरवावे.

**५. पॉलिथीन टयुब रोपे:**

(१) पॉलिथीन पिशवी मध्ये रोपे तयार केल्यास व पिशवीत अधिक कालावधीत रोपे राहिल्यास त्याची मूळ वेडीवाकडी होतील ते टाळण्याकरिता ज्या वन विभागात रुट ट्रेनर उपलब्ध आहे त्याचा वापर करुन रोपे वाढवावीत.

(२) या व्यतिरिक्त पॉलिथीन टयुबचा वापर करुन प्रत्येक रोपवाटिकेत रोपे तयार करावीत.

(३) या पुढे ५ वर्षाच्या कालावधीत टप्याटप्याने पॉलिथीन टयुबमध्ये रोपे तयार करण्याचे काम हाती घेऊन रोपे वाढवायची आहेत. ५ वर्षानंतर ८०% रोपे पॉलिथीन टयुबचा वापर करुन रोपे तयार करण्यात येतील याची दक्षता घ्यावी. या करिता नियोजन करुन कार्यवाही करावी.

**६. रोपवनात कामे सुरु करणेबाबत:**

रोपवनात खड्डे खोदणे, रोपे लागवड, निंदणी, मातीचा भरभांगलन इत्यादी कामे सुरु करतांना रोपवनाच्या समोरच्या भागातून सुरु न करता, शेवटच्या व मागच्या भागातून कामे सुरु करावीत.

**७. रोपे वाहतूक:**

(१) रोपवाटिकेतून रोपवन स्थळापर्यंत रोपे वाहतुक करण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर केला जातो. त्यामुळे पिशवितील रोपांच्या मुळांना हादरा बसतो व तंतुमय मुळे तुटतात. याशिवाय ट्रॅक्टरचा वरचा भाग मोकळा/उघडा असल्याने वाहणा-या वारा/हवेमुळे पिशवीतील रोपे मोठया प्रमाणावर शेंडयापासून बुडापर्यंत हलत असतात त्यामुळेही रोपांचे नुकसान होते. म्हणून ट्रॅक्टरने रोपांची वाहतूक करणे टाळावे.

(२) सर्वसाधारणपणे मिनी ट्रकचा वापर पिशवीतील रोपे वाहतूकीसाठी करावा. मिनीट्रक मध्ये रोपांच्या पिशव्या भरण्यापूर्वी तळाशी सुकलेले गवत इत्यादी अंथरावे जेणेकरुन रोपे वाहतूकीचे वेळी पिशवीतील

रोपांना हादरे लागणार नाहीत. मग त्यावर पिशवीतील रोपे एका थरात एकामागुन एक ठेवावीत. मिनी ट्रकचा वरचा व साईडचा भाग ताळपत्री इत्यादी लावून बंदिस्त असावा जेणेकरुन मिनीट्रक मधील रोपांचे हवा/वा-यापासून नुकसान होणार नाही.

(३) शक्यतो पाऊस सुरु होण्यापूर्वी रोपे रोपवन स्थळावर वाहतूक करुन ठेवावीत व पहिल्या पावसाच्या आगमनाबरोबर रोपांची लागवड करावी.

**८. अयशस्वी रोपवनात पुन्हा रोपवन कामे घेणे:**

(१) अयशस्वी झालेल्या रोपवनात पुन्हा रोपवन कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित उप वन संरक्षक यांनी अयशस्वी झाल्याबाबतची तपासणी करुन अहवाल तयार करावा. रोपवन कामाबाबत झालेल्या दुर्लक्षतेबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार अहवाल मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांना सादर करावा.

(२) रोपवनात असलेले नालाबांध, गुरे प्रतिबंधक चर व इतर कामाचा पंचनामा करावा व त्याबाबत वस्तुस्थिती सहाय्यक वन संरक्षक यांनी तपासणी करुन प्रमाणित करावे.

(३) जागेची परिस्थिती व कार्यआयोजनेतील तरतूदी विचारात घेऊन सदर वन क्षेत्राच्या उपचाराकरिता अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. नवीन कामे व जुन्या कामांच्या दुरुस्तीबाबत अंदाजपत्रकात वेगळयाने तरतूद करावी.

(४) जुन्या अयशस्वी रोपवन ठिकाणी रोपवन कामे घेण्याबद्दल मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांची मंजुरी प्राप्त करावी व त्या नुसारच रोपवनाचे अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याची कारवाई करावी.

**९. औषधी वनस्पती व इतर प्रजातीची लागवड :**

(१) प्रत्येक रोपवनात निवडक Rare, endangered & threatened वनस्पती प्रजातीचाही एक किंवा २ ग्रिड मध्ये लागवड करावी. या करिता रोपांमधील योग्य अंतर ठेवावे व खड्डयाचे आकारमान ठरवावे.

(२) रोपवन कामाचे नियोजन करतांना आवश्यक त्या ठिकाणी एक किंवा दोन औषधी वनस्पती प्रजातीची लागवड करण्यास नियोजन करावे, उदाहरणार्थ गुळवेल रोपे रोपवनात असलेल्या वृक्षाजवळ लागवड करता येवू शकतात. काही ठिकाणी कोरफडचीही लागवड करता येवू शकते व त्यामुळे झोन २ च्या क्षेत्रात व कमी पावसाच्या क्षेत्रात मृद संधारणही करणे शक्य होणार आहे. या बाबींचा विचार करुन रोपवनाचे अंदाजपत्रक तयार करावे.

**१०. जीवंत रोपांची टक्केवारी :**

(१) रोपवनात जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची दर वर्षी मे व ऑक्टोबर महिन्यात मोजदाद करुन त्याचा तपशील रोपवन नोंदवहीत लिहिणे बंधनकारक राहील.

(२) ५ व्या वर्षापर्यंत जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची रोपवन नोंदवहीत नियमितपणे वन परिक्षेत्र अधिकारी यांनी नोंदवावीत.

(३) प्रत्येक रोपवनाबाबत नोंदविण्यात आलेली जीवंत रोपांची टक्केवारी बरोबर आहे किंवा कसे याबाबत संबंधित सहाय्यक वन संरक्षक यांनी तपासणी करुन त्यानुसार रोपवन नोंदवहीत नोंद घ्यावी, व दिनांकासह स्वाक्षरी करावी.

(४) पर्यायी वनीकरण रोपवनाबाबत जीवंत रोपांची टक्केवारी व सरासरी उंची १० वर्षापर्यंत रोपवन नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे.

(५) जीवंत रोपांची टक्केवारी, सरासरी उंची व संरक्षणाची स्थितीबाबत सर्व रोपवनांचे, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी त्रैमासिक आढावा घ्यावा व रोपवनाच्या यशस्वीतेकरिता व कामात सुधारणा करण्याकरिता शास्त्रोक्त पध्दतीने रोपवन क्षेत्राच्या उपचारा करिता नियंत्रण ठेवून मार्गदर्शन करावे.

(६) जीवंत रोपांच्या टक्केवारी व सरासरी उंची बाबत दर वर्षी जून व नोव्हेंबर महिन्यात सर्व १ ते ५ वर्षीय रोपवनाबाबत अहवाल वन परिक्षेत्र अधिकारी यांनी उप वन संरक्षक यांचेकडे सादर करावा. वन परिक्षेत्र अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाची संबंधित सहाय्यक वन संरक्षक यांनी तपासणी करावी व रोपवनाची पाहणी करुन खात्री करावी. तफावत असल्यास त्यानूसार सुधारित माहिती रोपवन नोंदवहीत नोंदवावी व उप वन संरक्षक यांना कळवावे.

(७) जीवंत रोपांच्या टक्केवारी व रोपांच्या उंचीबाबत माहिती website वर ठेवण्याकरिता या कार्यालयाकडून दिलेल्या सूचनांनुसार सर्व प्रादेशिक वन विभागाने कार्यवाही करावी.

**<u>११. संरक्षण मजुर :</u>**

(१) रोपवनाची देखरेख व संरक्षणाकरिता स्थानिकरीत्या रोपवन स्थळावर मजुर लावण्यात येतात. सर्वसाधारण असे लक्षात आले आहे की, १ ते ३ वर्षा पर्यंत रोपवनाचे संरक्षकणाकरिता लक्ष देण्यात येते परंतु त्या नंतर रोपवनाच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष होते. रोपवनाचे संरक्षणाकरिता व गुरांच्या चराई पासून संरक्षणाकरिता संरक्षण मजुर लावून सुध्दा यांचेकडून योग्य ती संरक्षण कामे केली जात नाहीत परिणामी रोपवन अयशस्वी होते. त्यामुळे रोपवनावर व संरक्षण मजुरावर करण्यात आलेला खर्च निरर्थक ठरतो.

(२) याबाबत सुधारणा करण्यासाठी संबंधित वनपाल व वनरक्षक यांनी रोपवनाचे संरक्षण मजुर/चौकीदार यांच्या कामावर प्रभावी नियंत्रण ठेवावे.

(३) प्रत्येक वनपालांनी संरक्षण मजुराचे कामकाज समाधानकारक आहे किंवा कसे याबाबत रोपवन स्थळ निहाय मासिक अहवाल वन परिक्षेत्र अधिकारी यांना सादर करावा.

(४) रोपवन क्षेत्रात जनावरे शिरुन नुकसान करणार नाही याची देखरेख करणे, फुटवांचे एकेरीकरण, रोपवनाचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देणे व गुरे प्रतिबंधक चर उंचवटयाची किरकोळ दुरुस्ती करणे ही संरक्षण मजुरांची जबाबदारी राहील.

(५) संरक्षण मजुरांनी दर दिवशी रोपवना भोवती फिरुन कुंपणाची देखरेख करावी व त्याची किरकोळ दुरुस्ती करावी.

(६) संरक्षण मजुरास नेमून दिलेल्या वरील कामाबाबत दुर्लक्ष झाल्यास वन परिक्षेत्र अधिकारी यांनी संबंधितांचे विरुध्द कार्यवाही करावी. रोपवनाचे संरक्षणाकरिता संरक्षण मजुराचे कामकाज समाधानकारक नसल्यास त्यांना लेखी नोटीस बजावून नियमानूसार कार्यवाही करावी.

(७) वन परिक्षेत्र अधिकारी/सहाय्यक वन संरक्षक यांनी वारंवार सर्व रोपवनास भेट देऊन संरक्षण मजुराचे कामकाज व रोपवन संरक्षण बाबत नियंत्रण ठेवावे.

**१२. रोपवन नोंदवही :**

(१) रोपवन नोंदवहीत दर महिन्यात माहिती अद्यावत लिहून वन परिक्षेत्र अधिकारी यांनी प्रमाणित करुन स्वाक्षरी करावी.

(२) रोपवन नोंदवहीत जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची नोंदविणे बंधनकारक राहील.

(३) रोपवनात विविध बाबींवर झालेला बाबनिहाय खर्च आर्थिक वर्ष निहाय रोपवन नोंदवहीत वन परिक्षेत्र अधिकारी यांनी नोंदवावे.

(४) रोपवन नोंदवहीसोबत मंजूर अंदाजपत्रकाची प्रत लावून ठेवावी.

(५) वन परिक्षेत्र अधिकारी यांनी सर्व रोपवनांच्या नोंदवहयांची व मोजमाप पुस्तिकेची यादी करुन ठेवावी व बदलीच्या वेळी नव्याने रुजु झालेल्या वन परिक्षेत्र अधिकारी यांना यादीसह सर्व रोपवन नोंदवहया व मोजमाप पुस्तके हस्तांतरण करणे बंधनकारक राहील.

**१३. पूर्व पावसाळी व रोपे लागवड अहवाल:**

(१) प्रत्येक रोपवनाची पूर्व पावसाळी कामे, प्रथम वर्षात रोपे लागवड पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल विहित प्रपत्रात वन परिक्षेत्र अधिकारी यांनी उप वनसंरक्षक यांना सादर करावा व त्याची सहाय्यक वन संरक्षक यांनी तपासणी करावी.

**१४. रोपवनाचा पूर्णत्व अहवाल:**

(१) रोपवनाचा ५ वर्ष पूर्ण झाल्यावर रोपवन निहाय वस्तुस्थिती व पूर्णत्व अहवाल वन परिक्षेत्र अधिकारी यांनी संबंधित उप वन संरक्षक यांना विहित प्रपत्रात सादर करावा.

(२) सदर अहवालात योजना, रोपवन नमूना, जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची सरासरी उंची, वर्ष निहाय खर्च, रोपवनाचे संरक्षणाची स्थिती, रोपवने यशस्वी आहे किंवा अयशस्वी आहे इत्यादी बाबत माहिती पूर्णत्व अहवालात समाविष्ट करावी.

(३) पर्यायी वनीकरण रोपवनाबाबत ५ वर्ष व १० वर्ष पूर्ण झाल्यानंतर रोपवनांचा पूर्णत्व अहवाल वन परिक्षेत्र अधिकारी यांनी तयार करुन सादर करावा. त्यास सहाय्यक वन संरक्षक यांनी तपासून त्याबाबत अभिप्राय नोंदवावे.

(४) प्रत्येक मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) व उप वन संरक्षक यांनी १ ते ५ वर्षाच्या रोपवनबाबत आढावा घ्यावा त्यात रोपवनाची सद्य:स्थिती, जीवंत रोपांची टक्केवारी संरक्षण, गुरे प्रतिबंधक चराची देखभाल व दुरुस्ती रोपांची वाढ व रोपांची सरासरी उंची इत्यादी बाबत आढावा घेऊन कामावर संनियंत्रण ठेवावे.

(५) १०% रोपवनाची पाहणी करुन वन परीक्षेत्र अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवाल बरोबर आहे किंवा कसे याची तपासणी करणे उप वन संरक्षक यांची जबाबदारी राहील. याबाबत मुख्य वन संरक्षक यांनी सनियंत्रण करावे.

**१५.** प्रत्येक वन विभागात रोपवन कामे व रोपवाटिका कामाबाबत कार्यशाळा आयोजीत करुन क्षेत्रीय कर्मचा-यांना मार्गदर्शन करावे. जुन महिन्यामध्ये क्षेत्रीय कर्मचा-यांची बैठक आयोजित करुन रोपे वाहतूक व लागवड पध्दत व वेळेवर लागवडी बाबत योग्य पध्दत त्यांना समजवून सांगावी.

**१६.** प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे आदेश क्रमांक कक्ष १/योजना/इए/मवाप्र/९५-९६/१३ दिनांक १३/१०/१९९५ अन्वये व परिपत्रक क्रमांक कक्ष१/रोहयो/प्रक्र.१०/१४६९/२०१४-१५ दिनांक ६/१२/२०१४ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येतील याची दक्षता घेण्यात यावी.

**१७.** उप वन संरक्षक या पदनामामध्ये विभागीय वन अधिकारी, स्वतंत्र उप वन विभागाचा उप विभागीय वन अधिकारी यांचा समावेश आहे. सहाय्यक वन संरक्षक या पदनामात उप विभागीय वन अधिकारी किंवा त्यांचे समकक्ष अधिकारी यांचा समावेश आहे. वन परिक्षेत्र अधिकारी म्हणजे वन क्षेत्रपाल आहे. या आदेशातील तरतूदी सर्व वनीकरण, रोपे लागवड व जल व मृद संधारण कामासाठी लागु राहतील. हे आदेश सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांचे नजरेस आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. सदर सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधितांचे विरुध्द कडक कार्यवाही करावी.

(श्रीभगवान)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,
मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी (सर्व)
उप संचालक (बफर), ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
प्रतिलीपी:
१) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मंुबई
२) प्रधान मुख्य वन संरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) प्रधान मुख्य वन संरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
४) प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालयातील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
५) मुख्य वन संरक्षक शिक्षण वृत्त, पुणे
६) वन संरक्षक, कार्य आयोजना विभाग (सर्व)
७) मुख्य वन संरक्षक (मूल्यांकन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) उप वन संरक्षक/विभागीय वन अधिकारी, मूल्यांकन विभाग, सर्व

## प्रपत्र पी - १

## रोपवनाबाबत अंदाजपत्रकासोबत जोडावे लागणारे प्रमाणपत्र.

प्रमाणित करण्यात येते की, दिनांक ---------------------- रोजी ------------------ या रोपवन स्थळाची ------------- हेक्टर क्षेत्र, (कार्यआयोजनेचा वर्किंग सर्कल)कम्पार्टमेंन्ट क्रमांक-------------------बीट ----------

परिक्षेत्र ---------------------- वन विभाग ------------------- ची मी पाहणी केली असून रोपे लागवड व रोपवन क्षेत्राच्या उपचाराकरिता तयार करण्यात आलेल्या उपचार नकाशाची तपासणी केली असून, प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेनुसार उपचार नकाशा तयार करण्यात आला आहे व त्यात आवश्यक त्या सर्व बाबी दर्शविण्यात आलेल्या आहेत व त्या योग्य आहेत.

प्रमाणित करण्यात येते की, सदर रोपवनच्या उपचाराकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकाची मी तपासणी केली असून त्यातील तरतूदी सदर क्षेत्राच्या उपचाराकरिता योग्य आहे व कार्य आयोजनेत दिलेल्या उपचाराशी सुसंगत आहेत.

ठिकाण :------------

दिनांक :------------

नांव

पदनाम: सहाय्यक वन संरक्षक/उप विभागीय वन अधिकारी

------------------- वन विभाग ------------------

**प्रपत्र पी -2**

**पूर्व पावसाळी कामाचा अहवाल.**

1. **रोपवन ठिकाण** :

(1) रोपवन स्थळाचे नांव

(2) रोपवन लागवड वर्ष :

(3) वनविभाग : (4) परिक्षेत्र : (5) उपक्षेत्र :

(6) नियतक्षेत्र :

(7) कक्ष क्रमांक : (8) रोपवनाचे क्षेत्र : हेक्टर

2. **कार्य आयोजना वर्किंग सर्कल** :

3. **योजनेचे नांव** :

4. **मंजुरी** :

(1) तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक :

(2) प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक : (3) मंजूर रक्कम :

(4) अंदाज पत्रकाचा कालावधी :

5. **प्रती हेक्टर रोपे संख्या** :

6. **रोपामधील अंतर** :

7. **खर्चाचा तपशिल** :

(बाबनिहाय सर्व कामांचा खर्च रोपवाटिकेवर खर्चासह)

| अ. क्र. | कामाची बाब (खड्डा / चर चे आकारमान, संख्या, लांबी) | खर्चाची रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| एकूण | | | |

8. रोपवाटीकेचे नांव : 9. लागवडीस प्रस्तवित एकूण रोपांची संख्या :

10. प्रजाती निहाय प्रस्तावित रोपांची संख्या :

मी प्रमाणीत करतो की, वरिल प्रमाणे सर्व कामे पूर्ण झाली असून रोपवन मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन सर्व कामे 100% तपासणी केली आहे व रोपवन नोंदवही अद्यावत करण्यात आलेल्या आहेत.

ठिकाण :
दिनांक :

वन परिक्षेत्र अधिकारी

प्रमाणित करण्यात येते की, मी ------------------------------------------------------ सदर रोपवनाची पाहणी केली असून, मोजमाप पुस्तिका, रोपवन नोंदवहीची शहनिशा केलेली असून उपरोक्त माहिती बरोबर आहे. / काही कामे योग्य नसल्यास त्यानुसार माहिती नमुद करावी.

ठिकाण :

दिनांक :

सहाय्यक वन संरक्षक

**प्रपत्र पी - 3**

**प्रथम वर्षे रोपेलागवडीचा कामाचा अहवाल.**

1. **रोपवन ठिकाण** :

(1) रोपवन स्थळाचे नांव

(2) रोपवन लागवड वर्ष :

(3) वनविभाग : (4) परिक्षेत्र : (5) उपक्षेत्र :

(6) नियतक्षेत्र :

(7) कक्ष क्रमांक : (8) रोपवनाचे क्षेत्र : हेक्टर

2. **कार्य आयोजना वर्किंग सर्कल** :

3. **योजनेचे नांव** :

4. **मंजुरी** :

(1) तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक :

(2) प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक : (3) मंजूर रक्कम :

(4) अंदाज पत्रकाचा कालावधी :

5. **प्रती हेक्टर रोपे संख्या** :

6. **रोपामधील अंतर** :

7. **प्रथम वर्षात खर्चाचा तपशिल** :

(बाबनिहाय सर्व कामांचा खर्च रोपवाटिकेवर खर्चासह)

| अ. क्र. | कामाची बाब, मात्रा, संख्या, इत्यादी | खर्चाची रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| एकूण | | | |

9. पूर्व पावसाळी कामावर खर्च :

10. जिवंत रोपांची टक्केवारी : ऑक्टोबर महिना, वर्ष : ................सरासरी उंची ................ मीटर.

11. प्रथम वर्षावर झालेला एकूण खर्च : ................

12. लागवड केलेल्या रोपांची प्रजाती निहाय संख्या : ................

मी प्रमाणीत करतो की, रोपे लागवड पूर्ण झाली असून रोपवनाची मोजमाप पुस्तिकेत सर्व कामाची नोंद घेण्यात आली व सर्व कामांची मी तपासणी केली त्यानुसार मोजमाप पुस्तीकेत प्रमाणित केले व रोपवन नोंदवहीत अद्यावत नोंदी केलेल्या आहेत.

वन परिक्षेत्र अधिकारी

प्रमाणित करण्यात येते की, मी ------------------------------------------------------- सदर रोपवनाची पाहणी केली असून, मोजमाप पुस्तिका, रोपवन नोंदवहीची शहनिशा केलेली असून उपरोक्त माहिती बरोबर आहे. / काही कामे योग्य नसल्यास त्यानुसार माहिती नमुद करावी.

ठिकाण :

दिनांक :

सहाय्यक वन संरक्षक

**प्रपत्र पी - 4**

**पाच वर्षे पूर्ण झाल्यावर रोपवन पूर्णत्वाचा अहवाल.**

1. **रोपवन ठिकाण** :

(1) रोपवन स्थळाचे नांव

(2) रोपवन लागवड वर्ष :

(3) वनविभाग : (4) परिक्षेत्र : (5) उपक्षेत्र :

(6) नियतक्षेत्र :

(7) कक्ष क्रमांक : (8) रोपवनाचे क्षेत्र : हेक्टर

2. **कार्य आयोजना वर्किंग सर्कल** :

3. **योजनेचे नांव** :

4. **मंजुरी** :

(1) तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक :

(2) प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक : (3) मंजूर रक्कम :

(4) अंदाज पत्रकाचा कालावधी :

5. **प्रती हेक्टर रोपे संख्या** :

6. **रोपामधील अंतर** :

7. **खर्चाचा तपशिल (रोपवाटीकेसह)**:

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आर्थिक वर्ष | खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व पावसाळी कामे | | |
| 2 | प्रथम वर्षीय कामे | | |
| 3 | दुसरे वर्ष कामे | | |
| 4 | तिसरे वर्ष कामे | | |
| 5 | चौथे वर्ष कामे | | |
| 6 | पाचवे वर्ष कामे | | |
| एकूण खर्च | | | |

8. **लावलेली एकूण रोपे (मरअळी वगळून)** :

9. **जीवंत रोपांची टक्केवारी** :

| अ.क्र. | कामाचा तपशील | कामाचे वर्षे | **जिवंत रोपांची टक्केवारी व सरासरी** | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे | | ऑक्टोबर | |
| | | | टक्केवारी | उंची मीटर | टक्केवारी | उंची मीटर |
| 1 | प्रथम वर्ष | | | | | |
| 2 | दुसरे वर्ष | | | | | |
| 3 | तिसरे वर्ष | | | | | |
| 4 | चौथे वर्ष | | | | | |
| 5 | पाचवे वर्ष | | | | | |

10. **लागवड केलेल्या रोपांची प्रजाती निहाय संख्या** :

11. रोपवनांचे संरक्षण, गुरे प्रतिबंधक चरांची स्थिती, आगीपासुन संरक्षण, रोपांची वाढ व उंची, जीवंत रोपांची टक्केवारी, यशस्वी आहे किंवा अयशस्वी आहे याबाबत कारणमीमांसा, इत्यादी बाबत माहिती :

मी प्रमाणीत करतो की, वरिल प्रमाणे कामे पूर्ण झाली असून रोपवनाची मोजमाप पुस्तिका व रोपवन नोंदवही मध्ये अद्यावत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

वन परिक्षेत्र अधिकारी

प्रमाणित करण्यात येते की, मी ------------------------------------------------------- सदर रोपवनाची पाहणी केली असून, मोजमाप पुस्तिका, रोपवन नोंदवहीची शहनिशा केलेली असून उपरोक्त माहिती बरोबर आहे. / काही कामे योग्य नसल्यास त्यानुसार माहिती नमुद करावी.

ठिकाण :

दिनांक :

सहाय्यक वन संरक्षक

## प्रपत्र पी - 5

## दहा वर्षे पूर्ण झाल्यावर रोपवन पूर्णत्वाचा अहवाल.

1. **रोपवन ठिकाण** :

(1) रोपवन स्थळाचे नांव

(2) रोपवन लागवड वर्ष :

(3) वनविभाग : (4) परिक्षेत्र : (5) उपक्षेत्र :

(6) नियतक्षेत्र :

(7) कक्ष क्रमांक : (8) रोपवनाचे क्षेत्र : हेक्टर

2. **कार्य आयोजना वर्किंग सर्कल** :

3. **योजनेचे नांव** :

4. **मंजुरी** :

(1) तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक :

(2) प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक : (3) मंजूर रक्कम :

(4) अंदाज पत्रकाचा कालावधी :

5. **प्रती हेक्टर रोपे संख्या** :

6. **रोपामधील अंतर** :

7. **खर्चाचा तपशिल (रोपवाटीकेसह)**:

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आर्थिक वर्ष | खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व पावसाळी कामे | | |
| 2 | प्रथम वर्षीय कामे | | |
| 3 | दुसरे वर्षे कामे | | |
| 4 | तिसरे वर्षे कामे | | |
| 5 | चौथे वर्षे कामे | | |
| 6 | पाचवे वर्षे कामे | | |
| 7 | सहावे वर्षे | | |
| 8 | सातवे वर्ष कामे | | |
| 9 | आठवे वर्ष कामे | | |
| 10 | नऊवे वर्ष कामे | | |
| 11 | दहावे वर्ष कामे | | |
| एकूण खर्च | | | |

8. **लावलेली एकूण रोपे (मरअळी वगळून)** :

9. **जीवंत रोपांची टक्केवारी** :

| अ.क्र. | कामाचा तपशील | कामाचे वर्षे | जिवंत रोपांची टक्केवारी व सरासरी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे | | ऑक्टोबर | |
| | | | टक्केवारी | उंची मीटर | टक्केवारी | उंची मीटर |
| 1 | प्रथम वर्ष | | | | | |
| 2 | दुसरे वर्ष | | | | | |
| 3 | तिसरे वर्ष | | | | | |
| 4 | चौथे वर्ष | | | | | |
| 5 | पाचवे वर्ष | | | | | |
| 6 | सहावे वर्ष | | | | | |
| 7 | सातवे वर्ष | | | | | |
| 8 | आठवे वर्ष | | | | | |
| 9 | नऊवे वर्ष | | | | | |
| 10 | दहावे वर्ष | | | | | |

10. **लागवड केलेल्या रोपांची प्रजाती निहाय संख्या** :

11. रोपवनांचे संरक्षण, गुरे प्रतिबंधक चरांची स्थिती, आगीपासुन संरक्षण, रोपांची वाढ व उंची, जीवंत रोपांची टक्केवारी, यशस्वी आहे किंवा अयशस्वी आहे याबाबत कारणमीमांसा, इत्यादी बाबत माहिती :

मी प्रमाणीत करतो की, वरिल प्रमाणे कामे पूर्ण झाली असून रोपवनाची मोजमाप पुस्तिका व रोपवन नोंदवही मध्ये अद्यावत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

वन परिक्षेत्र अधिकारी

प्रमाणित करण्यात येते की, मी ---------------------------------------------------- सदर रोपवनाची पाहणी केली असून, मोजमाप पुस्तिका, रोपवन नोंदवहीची शहनिशा केलेली असून उपरोक्त माहिती बरोबर आहे. / काही कामे योग्य नसल्यास त्यानुसार माहिती नमुद करावी.

ठिकाण :

दिनांक :

सहाय्यक वन संरक्षक